## प्रसिध्दीपत्रक

## काम वाटप समिती, जिल्हा परिषद, जळगांव

ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णयः- ग्रासयो-२०२०/प्र.क्र./७०/बांधकाम-२, दिनांकः ०५ एप्रिल, २०२३ अन्वये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे नोंदणीकरण, सवलती व काम वाटप समिती रचना व कार्यपध्दती याबाबत काही सुधारणा करण्यात आलेल्या असुन याप्रसिध्दी पत्रकान्वये सर्व संबंधितांचे निदर्शनास सदर सुचना आणुन देण्यात येत आहेत.

१) जिल्हा परिषद जळगांव काम वाटप समितीची रचना व कार्यपध्दती यापुढे ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णयः- ग्रासयो-२०२०/प्र.क्र./७०/बांधकाम-२, दिनांकः ०५ एप्रिल, २०२३ अन्वये अंमलात राहील.

२) यापुढे वर्ग-५ प्रमाणे स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांना प्रथम नोंदणी देण्यात येईल म्हणजे स्थापत्य सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना रु. ५० लक्ष पर्यंतची कामे देण्यात येतील.

३) सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांच्या नोंदणीकरणाची मुदत नोंदणीकरण केल्यापासुन १० वर्षे इतकी राहील. जे सुशिक्षीत बेरोजगार अभियंता नोंदणीकृत त्यांच्या नोंदणीच्या उर्वरीत कालावधीसाठी देखील रु. ५० लक्ष पर्यंतची कामांची मर्यादा ठेवण्यात येत आहे.

४) सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्थापत्य) यांच्या नोंदणी कालावधीत विनास्पर्धा देण्यात येणा-या एकूण कामांची मर्यादा रु. १०० लक्ष करण्यात येत आहे ज्या सुशिक्षीत अभियंत्यांना दहा वर्षाच्या कालावधीत रु. १०० लक्ष रक्कमेची कामे विनास्पर्धा मिळालेली नसतील अशा सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना त्यांची मुळ दहा वर्षे पर्यंतची नोंदणी मर्यादा, त्यांचा रु.१०० लक्ष रक्कमेचा कोटा पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त पुढील पाच वर्षापर्यंत यापैकी जी बाब लवकर पूर्ण होईल तोपर्यंत वाढविण्यात येईल तथापि सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्याने नोंदणीची मुदत वाढविणेबाबत विनंती अर्ज करणे अनिवार्य राहील.

## समितीची कार्यपध्दती.

१) संबंधीत ग्रामपंचायतीने काम करण्यास नकार दिल्यास रु. ५ ते १५ लक्ष किमंतीपर्यंतच्या कामांचे वाटपासाठी मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांच्यामध्ये २६:४०:३४ या प्रमाणात कामे निश्चित करण्यात येतील.

२) समितीची बैठक प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला (सुट्टी असल्यास पुढील कामकाजाच्या दिवशी) दुपारी होईल तसेच कामाच्या निकडयानुसार जादा बैठक होतील.

३) ग्रामपंचायत/मजूर सहकारी संस्था/सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्याकडून कामे मिळविण्यासाठी जेवढे अर्ज समितीकडे प्राप्त होतील त्याची यादी तसेच कोणत्या कामासाठी किती ग्रामपंचायत/मजूर सहकारी संस्था/सुशिक्षीत बेरोजगार अभियंता इच्छुक आहेत याबाबतची सर्व माहिती सुचना फलकावर जाहीर करण्यात येईल.

४) जे सुशिक्षित बेरोजगार अभियंता/मजूर सहकारी संस्था कामासाठी इच्छापत्र देतील तेंव्हा त्यासोबत त्यांना देण्यात आलेले कामांचे पासबुक सादर करणे आवश्यक आहे. जर पासबुक सादर केले नाही तर त्याने एकदा काम नाकारले असे गृहीत धरण्यात येईल व अशा स्थितीत इच्छापत्र असले तरी सुशिक्षित बेरोजगार अभियंता/मजूर सहकारी संस्था यांचे नांव विचारात घेतले जाणार नाहीत. **यास्तव सद्यस्थितीत बांधकाम विभाग, जिल्हा परिषद जळगांव कार्यालयाकडे आजअखेर नोंदणीकृत असलेल्या सर्व सुशिक्षित बेरोजगार अभियंता/मजूर सहकारी संस्था यांनी कामांचे पासबुक दिनांक १५/०६/२०२३ पासुन पुढील आठ दिवसांचे आंत अद्ययावत करुन घ्यावे अन्यथा पासबुक अद्ययावत कामे करेपर्यंत संबंधित मक्तेदार संस्थेस काम देण्यात येणार नाही.**

५)    सुशिक्षित बेरोजगार अभियंता /मजूर सहकारी संस्था यांना समितीमार्फत कामांचे वाटप करतांना त्यांनी स्वतंत्र कंत्राटदार म्हणून घेतलेली एकूण कामे व अशा संस्थाना समितीमार्फत देण्यात यावयाची कामे अशा सर्व कामांची संख्या एकावेळी तीनपेक्षा जास्त होणार नाही व विहीत पतमर्यादेच्या बाहेर कामे दिली जाणार नाहीत.

६)    ई- निविदेनुसार पात्र ठरणा-या घटकांना कामे देण्याबाबत योग्य ते निर्णय घेण्याचे अधिकार समितीस राहतील तसेच जर काम देणारे संबंधित खाते व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेमध्ये तंटा निर्माण झाल्यास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहिल. हा निर्णय लवादाचा म्हणून न राहता प्रशासकीय निर्णय म्हणून समजला जाईल.

**सदस्य सचिव**
**काम वाटप समिती तथा**
**कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग**
**जिल्हा परिषद जळगांव**

**अध्यक्ष**
**काम वाटप समिती तथा**
**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

**प्रतः- जिल्हा परिषद नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरीता.**
**प्रतः- जिल्हा परिषद जळगांव संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव.**
**प्रतः- म.संपादक दैनिक--------------- कृपया सदर प्रसिध्दीपत्रकास प्रसिध्दी द्यावी ही विनंती.**